

राजराणी असूनही! राजयोगिनी झाली!
पुण्यची कामे करूनी! "पुण्यश्लोक" म्हणून!
जनमानसी अमर झाली!
अहिल्याबाई होळकर
यांना जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन

दैनिक सेवाशक्ती टाईम्स

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- 3 रे ● अंक:- ९९ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/2022/87884 ● शनिवार 31 मार्च २०२५

# "मिटकरीनी थोडं औकातीत बोलावं , कपडे अंगावर राहणार नाहीत"; हाके यांचे मिटकरी यांना खुले चॅलेंज

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



**मुंबई :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी नवी कोरी फॉर्च्युनर कार घेतली आहे. या फॉर्च्युनर कारवरुन आता घमासान सुरु झाले आहे. आपण ओबीसींच्या प्रश्नांवर प्रवास करीत असतो. त्यामुळे जनतेने आपल्याला ही भेट दिल्याचे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. यावरुन राष्ट्रवादीचे नेते अमोल मिटकरी यांनी हाके यांच्यावर जोरदार टीका केली होती. आता या टीकेला अखेर लक्ष्मण हाके यांनी देखील त्याहून तिखट भाषेत उत्तर दिले आहे. लक्ष्मण हाके प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले की,' मिटकरी आपण वरिष्ठ सभागृहाचे सदस्य आहात. या सदसत्वाला शोभेल अशी भाषा तुम्ही वापरा आम्ही जर बोलायला लागलो तर तुमचे सोडा, तुमच्या आकाचेही कपडे अंगावर राहणार नाहीत. त्यामुळे अमोल मिटकरीनी थोडं औकातीत बोलावं असा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. ते पुढे एकदम एकेरीवर आले आणि म्हणाले की अमोल मिटकरी हा अजितदादा पवार यांच्या घरात झाडू पोछा आणि टॉयलेट साफ करणारा आमदार आहे. आजपर्यंत याला बाजारु विचारवंत म्हणून ओळखले जात होते असे हाके यांनी सुनावले आहे.अमोल मिटकरी हा स्वतःला ओबीसीचा नेता समजतो, विधानपरिषदेचा आमदार झाल्यावर ओबीसीच्या किती प्रश्नावर त्यानं आवाज उठवला. जन्माने ओबीसी असून चालत नाही. कर्तृत्वाने ओबीसीचा लीडर असावे लागते असेही हाके यांनी यावेळी मिटकरी यांनी सुनावले आहे. जरांगे पाटलांना ओबीसीतूनच का आरक्षण पाहिजे, त्यावेळेस "तू कोणाचे *** होते का " अशी खालच्या भाषेत हाके यांनी अमोल मिटकरी यांच्यावर यावेळी टीका केली आहे. गेल्यादोन वर्षांपासून जरांगे- पाटील बेकायदेशीर मागण्या करीत आहे, ओबीसींना घरात घुसून मारण्याची भाषा करत आहे. ओबीसीच्या नेत्या विरोधात बोलत आहे आणि तू जन्माने ओबीसी आणि कर्तृत्वाने अजित दादाचा झाडू पोचावाला... तू आम्हाला शिकवतो का ओबीसीची चळवळ काय ? याच अजितदादाने शेअर मार्केटला लाजवेल अशी सारथीची बिल्डिंग उभी केली. मग महाज्योतीला कार्यालय नाही का नाही ? अजितदादाच्या हाताला लकवा मारलाय काय ? तू ओबीसींच्या प्रश्नांनावर तू मला y z म्हणतो? झाकण झुल्या म्हणतो ? तुझ्यात हिमंत असेल दम असेल तर ये समोर... जन्माने ओबीसी आहे ना तर कर की ओबीसीचे आंदोलन उभे, असे म्हणत अमोल मिटकरी यांना हाके यांनी अत्यंत शेलक्या भाषेत खुले चॅलेंज दिले आहे.

> **एका मेंढपाळाच्या पोराला गाडी दिली तर !**
>
> **अजित पवार गेले 20 वर्ष अर्थमंत्री पदावर का बसलाय? पीएचडी केली काय त्यांनी ? पोल्ट्री फार्मवाले अजित पवार काकांच्या जीवावर राजकारणात आले. अर्थशास्त्रामधला सोशल जस्टीस आणि इंजस्टीस म्हणजे काय हे तर माहिती आहे का? अमोल मिटकरी हा फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातला आमदार आहे. त्यांना लाज वाटली पाहिजे एका मेंढपाळाच्या पोराला गाडी दिली तर हा या विषयावर बोलतो. बजेटरी वरती अभ्यासपूर्ण बोला ना? अमोल मिटकरी तुझ्याकडे ईडी सीबीआय आहे. तर टाक मला जेलात..अशा शब्दात ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी अमोल मिटकरी यांच्यासह अजित पवार यांचाही खरपूस समाचार आहे.**

# 'त्या' मुख्यमंत्री लाडक्या बहिणींना योजनेतून वगळलं; मंत्री आदिती तटकरे यांनी दिली मोठी अपडेट

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

**मुंबई :** ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे, ही एक राज्य सरकारची महत्वकांक्षी योजना आहे, या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. मात्र ही योजाना सुरु करतानाच या संदर्भात सरकारनं काही अ टी घातलेल्या होत्या, या अटीमध्ये न बसणाऱ्या महिला देखील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेताना दिसून येत आहेत, या संदर्भात आता शासनानं मोठा निर्णय घेतला आहे. लाभार्थी महिलांच्या अर्जाची पडताळणी करण्यात येत आहे, ज्या महिला या योजनेच्या अटींमध्ये बसत नाहीत त्यांचा अर्ज बाद ठरव ला जात आहे, त्यांना या योजनेतून वगळण्यात येत आहे. अनेक महिलांचं उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त असताना तसेच नावावर घर आणि चारचाकी वाहन असताना देखील काही महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचं दिसून आलं आहे, या महिलांची नावं या योजेनेतून वगळण्यात येत आहेत. धक्कादायक म्हणजे चक्क सरकारी कर्मचारी असलेल्या महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती आता समोर आली आहे. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी ट्विट करत माहिती दिली आहे."लाभार्थ्यांची पडताळणी" ही कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीतील सर्वसाधारण व नियमित प्रक्रिया आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीतही ही प्रक्रिया राबवली जाते. या प्रक्रियेत सेवार्थ मधील जवळपास २ लाख अर्जांची पडताळणी केल्यानंतर त्यात सुमारे २२८९ सरकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नाव नोंदणी केल्याची बाब जानेवारी- फेब्रुवारी दरम्यानच लक्षात आली असून तेव्हापासून अशा व्यक्तींना कोणताही लाभ वितरित करण्यात आलेला नाही. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ योग्य लाभार्थ्यांनाच देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून, यासाठी अर्जांची पडताळणी ही नियमितपणे चालणारी प्रक्रिया असणार आहे'. असा ट्विट आदिती तटकरे यांनी केलं आहे.



# प्रेमासाठी पोराला टाकून पाकिस्तानात गेलेली नागपूरची सुनीता चौकशीच्या फेऱ्यात अडकली! 'या' दिवसापर्यंत पोलीस कोठडी

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

**नागपूर :** नागपूरमधून लडाख फिरायला गेलेल्या महिलेने आपल्या १२ वर्षांच्या मुलाला गावातच सोडून सीमेपल्याड पाकिस्तानात पळून गेलेल्या महिलेला आता पाकिस्तानी रेंजर्सनी भारतात परत पाठवले आहे. मात्र, भारतात परतल्यानंतर आता ही महिला कायद्याच्या कचाट्यात अडकली आहे. भारतीय सुरक्षा दलाने सुनीताला नागपूर पोलिसांकडे सोपवले असून, आता तिला पोलिसांनी औपचारिकरित्या अटक केली आहे. बुधवारी रात्री सुनीताला विशेष न्यायालयात हजर करण्यात आले असतं, तिला २ जूनपर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. अमृतसर पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असून, सदर प्रकरणाचा तपास सध्या कपिलनगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात सुरु आहे.



झोन ५चे पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांनी यासंदर्भात माहिती दिली.

**अमृतसरहून नागपूरपर्यंतचा प्रवास!**

सुनीता जमगडे यांना अटक केल्यानंतर नागपूर पोलिसांच्या चार सदस्यीय पथकाने अमृतसर पोलिसांकडून ताबा घेतला. सुनीताला घेऊन हे पथक मंगळवारी रात्री ट्रेनने दिल्लीमार्गे नागपूरकडे रवाना झाले. तत्पूर्वी, शनिवारी पाकिस्तान प्रशासनाने तिला अटारी सीमेवरुन भारतीय सुरक्षा दलाच्या स्वाधीन केले होते.

**पोलिसांचा संशय आणि तपासाचा फोकस!**

तपासातील अधिकाऱ्यांनुसार, सुनीताने पाकिस्तानात वास्तव्यास असताना काही व्यक्तींशी संपर्कात राहत, विविध प्रकारची माहिती शेअर केली असण्याची शक्यता आहे. विशेषतः झुल्फिकार आणि पास्टर या पाकिस्तानी नागरिकांशी झालेल्या संवादाबाबत चौकशी करण्यात येणार आहे.

**नागपूरहून कारगिल ते पाकिस्तानचा प्रवास!**

सुनीता जमगडे ही नागपूरच्या संत कबीरनगर परिसरातील रहिवासी असून, तिने ४ मे रोजी आपल्या १२ वर्षीय मुलासह कारगिल फिरण्याची योजना बनवली होती. पोलिसांच्या माहितीनुसार, १४ मे रोजी तिने नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानात प्रवेश केला. विशेष बाब म्हणजे सीमा ओलांडण्यापूर्वीच तिने तिच्या मुलाला मागे सोडले होते. पाकिस्तानात प्रवेश केल्यानंतर सुनीताला तिथल्या सुरक्षा दलाने पकडले. अधिकृत कारवाईनंतर सुनीताचा ताबा भारताकडे सोपवण्यात आला आहे. पोलीस सूत्रांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणात आणखी काही नावं समोर येण्याची शक्यता असून, जमगडे यांच्याशी संपर्कात असलेल्यांची चौकशी होणार आहे. पाकिस्तानात गेल्यानंतर सुनीताने कोणाशी संपर्क साधला, किती काळ तिथे राहिली, आणि त्या काळात काय घडले, याची चौकशी होणार आहे.

# एकनाथ शिंदे यांना लिहिता वाचता येत असेल तर त्यांनी...; संजय राऊत यांचा खोचक टोला काय?

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या 'नरकातला स्वर्ग' या पुस्तकाचे काही दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्या हस्ते प्रकाशन झाले. राऊत हे तुरुंगात असतानाच्या काही दिवसांचे अनुभव आणि त्यांचे विचार त्यांनी या पुस्ताकत लिहीले असून अनेक गौप्यस्फोटही करण्यात आले आहेत. प्रकाशनापूर्वी पासूनच राऊतांचं हे पुस्तक चर्चेत असून त्यांनी ते राज ठाकरे, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांनाही वाचण्यासाठी पाठवलं होतं. मात्र त्यासोबतच त्यांनी एक पत्रही धाडलं होतं. आज माध्यमाशी संवाद साधतानाच राऊतांना त्या पुस्तकावरुन आणि पत्रावरुनच एक सवाल विचारण्यात आला होता. त्यावेळी उत्तर देतानाच राऊत यांनी माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सणसणीत टोला लगावला आहे. " एकनाथ शिंदेंनी हे पुस्तक वाचलं पाहिजे. वाचायलाच पाहिजे. त्यांना व्यवस्थित लिहिता वाचता येत असेल तर त्यांनी शांतपणे या पुस्तकाचा गाभा समजून घेतला पाहिजे" अशा शब्दांत राऊतांनी एकनआथ शिंदेवर हल्ला चढवला.अनेक गोपनीय गोष्टीचा गौप्यस्फोट करावा लागेल. ते नैतिकतेला धरुन नाही. स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे. ज्या गोष्टी गोपनीय आहेत असं मानतो त्यावर लिहिणं आणि प्रकाश टाकणं हे नैतिकतेला धरुन नाही. आपण विश्वासाने काही गोष्टी चर्चा करतो, किंवा कोणी काही सांगतो नंतर त्याचा आपल्या प्रसिद्धीसाठी गैरवापर करणं, खळबळ किंवा सनसनाटी माजवण्यासाठी मला ते पटत नाही, असं संजय राऊत यांनी स्पष्ट केलं.भाजप पुरस्कृत ज्या यंत्रणा आहेत, ज्यांनी राजकारणात दहशत वाद, दबाव अशा प्रकारचं काम करुन नरेंद्र मोदी आणि त्यांच्या पक्षाला मदत होईल अशा पद्धतीने कारवाया केल्या. सर्वाधिक नव्हे तर १०० टक्के कारवाया भाजप विरोधकांवर करुन त्यांच्या मदतीने विरोधकांचे पक्ष फोडले. आमदार खासदार फोडले. सरकारं पाडलं. तरीही या देशात आमच्यासारखे लोक आहेत, जे या दहशतीला बळी पडले नाहीत. स्वाभिमानाने तेव्हाही जगले आणि आजही जगतात. आणि निष्ठेने आम्ही आमच्या पक्षा सोबत आहोत. अशा पद्धतीने संघर्ष करुनही आपल्याला उभं राहता येतं. हेच या पुस्तकातून सांगितलं, त्याचं प्रयोजन तेच आहे असं राऊत म्हणालेत.

> **एकनाथ शिंदेंना लिहीता वाचता येत असेल तर...**
>
> **एकनाथ शिंदेंनीदेखील हे पुस्तक वाचलं पाहिजे, वाचायलाच पाहिजे. त्यांना व्यवस्थित लिहिता वाचता येत असेल तर त्यांनी शांतपणे या पुस्तकाचा गाभा समजून घेतला पाहिजे असा टोला राऊतांनी हाणला. बराच काळ ते आमचे सहकारी होते. विशेषत: जेव्हा त्यांचा भाजपात पळून जाण्याचा मार्ग निर्माण झाला त्याच्या आधी आणि साधारण त्या काळात ते माझ्यासोबत होते. माझ्या बाबत काय चाललंय याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यामुळे त्या पत्रात मी म्हटलंय या घटनांचे तुम्ही साक्षीदार आहात. त्यामुळे तुम्ही पुस्तक वाचलं पाहिजे, असंही राऊत म्हणाले.**

> **अनेक गोपनीय गोष्टीचा गौप्यस्फोट करावा लागेल. ते नैतिकतेला धरून नाही. स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे. ज्या गोष्टी गोपनीय आहेत असं मानतो त्यावर लिहिणं आणि प्रकाश टाकणं हे नैतिकतेला धरून नाही. आपण विश्वासाने काही गोष्टी चर्चा करतो, किंवा कोणी काही सांगतो नंतर त्याचा आपल्या प्रसिद्धीसाठी गैरवापर करणं, खळबळ किंवा सनसनाटी माजवण्यासाठी मला ते पटत नाही, असं संजय राऊत यांनी स्पष्ट केलं.**

# अलीकडच्या काळात मराठी साहित्याच्या क्षितिजावर चमकणारा तारा - अजीम नवाज राही

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**





**साखरखेर्डा :** महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे येथील प्रख्यात साहित्यिक व नामवंत निवेदक **अजिम नवाज राही** यांना ता.२६ में रोजी परिषदेचे अध्यक्ष रावसाहेब कसबे व प्रसिद्ध हिंदी साहित्यिक सविता सिंग यांच्या हस्ते व प्रसिद्ध कवयत्री अंजली कुळ कर्णी, कोषाध्यक्ष ,मिलींद कुळकर्णी, प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार आणि कार्याध्यक्ष मा मिलींद जोशी, विनोद जोशी आदींच्या प्रमुख नामवंतांच्या उपस्थितीत पूणे येथील सुसज्ज एस, एम जोशी सभा गृहात भा. रा. तांबे पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या निमित्ताने साहित्यिक अजिम नवाज राही यांच्या साहित्यिक शब्द यात्रेच्या वाट चालीचा आढावा. अलिकडच्या काळात मराठी साहित्याच्या क्षिती जावर तळपणारा तारा अज़ीम नवाज़ राही. आपल्या कवितेच्या क्षेत्रातून दिलेल्या अपूर्व योगदानामुळे साहित्य नगरीत साखरखेर्डाचे नाव कोरले. घरातील गरीबीमुळे किमान ई. १० पर्यंतही शिक्षण पूर्ण करु न शकणाऱ्या मातृभाषा उर्दू असणाऱ्या येथील एका नैसर्गिक साहित्यिक दृष्टी लाभलेल्या युवकाच्या कविता महा राष्ट्रातील विविध विद्यापीठां मध्ये पदवी तथा पदवीव्यूत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी विद्यापीठ अभ्यास क्रमात समाविष्ट केल्या जाव्यात एक जागतिक आश्चर्यच म्हणावे लागेल. आणि हे आश्चर्य घडले आहे येथील जाफ्राबाद मोहल्ल्या तील युवकाच्या बाबतीत. मातृभाषा उर्दू असूनही माय मराठीच्या साहित्य क्षेत्रात आपल्या अमोघ वाणी आणि लेखणीतून अमुल्य भर टाकणाऱ्या मराठी शब्ददौलतीचे धनी *अजिम नवाज़ राही असे या युवकाचे नाव.अलिकडच्या काळात साखरखेर्डा ची राज्यभरात ओळख झाली ती प्रसिद्ध साहित्यिक व नामवंत निवेदक अजिम नवाज़ राही मुळे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. साहित्याच्या क्षेत्रात आपल्या प्रतिभेची अमीट छाप उमटवून साखरखेर्ड्याचे नाव राज्यातच नाही देशातच नाही तर साता समुद्रापार पोहोचविणाऱ्या प्रसिध्द कवि, नामवंत निवेदक अजिम नवाज़ राही यांच्या मुळे. अजीम नवाज राही महाराष्ट्र राज्याच्या लेखणी आणि वाणी या दोनही क्षेत्रातील महत्वाचं आणि वलयांकित नाव. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील भरीव योगदानामुळे साखरखेर्डा या दूर्गम भागातील खेडेवजा गावाचाही नावलौकिक वाढविला आहे. पौराणिक, ऐतिहासिक तथा सांस्कृतिक वारसा जपणारे गाव अशी साखरखेर्डा गावची ओळख. पुराणातील धौम्य ऋषींनी या भागात वास्तव्य केले अशी आख्यायिका असून खेटकासूर नावाचा उपद्रवी राक्षस याठिकाणी राहत असल्याने या गावचे नाव फार पूर्वी खेटकपूर होते अशीही आख्यायिका आहे.सुमारे एक हजार वर्षांपूर्वी -उज्जैन धर्मपीठाचे - श्रीमद् जगद्गुरु पलसिध्द महास्वामीं हे धर्मप्रसारासाठी देश भ्रमण करीत असतांना साखरखेर्डा येथे स्थिरावले.त्यांच्या शिष्यांनी मोठा मठ बांधला. त्यांचा शिष्य संप्रदाय महाराष्ट्रासह कर्नाटक तामिळ नाडू आदी राज्यांत पसरलेला असल्याने साखरखेर्डा नगरीची ओळख पलसिध्द महास्वामी मुळे सर्वदूर पसरली आहे. तसेच सद्गुरु प्रल्हाद महाराज (रामदासी) यांचे अनुयायी सुध्दा महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यात असल्याने साखर खेर्डा नाव सर्वदूर पोहोचले. मोगल राजवटीत इ. स. १७२७ उत्तरेकडील मोगल दख्खनच्या निजामशाह यांच्या सैन्यात युद्ध होऊन निजामाची फत्ते (विजय) झाल्याने या गावचे नाव फत्तेखेर्डा पडले ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत कायम होते. स्वातंत्र्यानंतर या गावचे नाव पुन्हा साखरखेर्डा पडले. यापूर्वी कवी अमृतराय हे कवी येथे होऊन गेले.अलिकडच्या काळातील नामवंत कवी ना. घ. देशपांडे यांची "शीळ" हे काव्य देखील याच परिसरातील जंगलात घुमले. मात्र अलिकडच्या काळात साखरखेर्डा नगर व सिंदखेड राजा तालुक्याचे नाव साहित्य क्षेत्रात सर्वदूर देशपातळीवर पोहोचविण्याचे काम जर कुणी केले असेल तर ते येथील प्रसिद्ध साहित्यिक अजिम नवाज राही यांनी.

**प्रकाशित कविता संग्रह -** "व्यवहाराचा काळा घोडा", "कल्लो ळातला एकांत", "वर्तमानाचा वतनदार", "तळमळीचा तळ" असे चार सकस कविता संग्रह प्रकाशित झाले असून "वळीवाच्या वेळा" हा पाचवा कविता संग्रह प्रकाशनास सिध्द झालेला आहे. पारंपारिक चौकट सोडून आपल्या कविता मधून सामाजिक जाणीव ठेवत समाजाच्या वेदना, वास्तव, संघर्षाची त्यांनी उत्तम मांडणी केली आहे. त्यामुळेच अजीम राही यांच्या कवितांचा समावेश माध्यमिक (ई.१०वी) व उच्च माध्यमिक ( ई.'१२) वी च्या अभ्यासक्रमात तर समाविष्ट करण्यात आल्या आहेतच शिवाय महा राष्ट्रातील विविध ११ विद्यापीठांच्या अभ्यास क्रमात राही यांच्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे. साखरखेर्डा या ऐतिहासिक नगरीत जन्मलेल्या अजीम नवाज राही यांचे नाव प्रयोगा शीलतेचे बलस्थान असून हे कुठल्याही जुन्या वाटेने न जाता नवनिर्मितीची शोध घेऊन त्यांचा ठसा मराठी कवितेच्या पानावर ठळकपणे उमटवली आहे.स्वत: गरीब कुटुंबात जन्म घेतल्यामुळे अजीम राही यांना गरीब, शोषित, पिडीत, शेतकरी, शेतमजूर आदींच्या भावनांची सखोल जाणीव आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेतील व्यक्त होणारे भाव हे दुरितांचे दुःख सर्वसामान्य नागरिक तथा शेतकरी, शेतमजुर, काम गारांच्या, शोषितांच्या अस्तित्वहीन माणसाच्या जगण्यातले आहे. त्यामुळे आतापर्यंत त्यांच्या कविता संग्रहांवर अनेक पुरस्कारांचा वर्षाव झाला आहे.

**आतापर्यंत मिळालेले पुरस्कार -** अजीम नवाज राही यांना आजतागायत अमेरिकेतील फाउंडेशन, भारतातील केशव गोरे स्मारक ट्रस्ट मुंबई चा साहित्य प्रांतातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र फाउंडेशन साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय लेखनाचा कवी केशवसुत पुरस्कार, विदर्भ साहित्य संघाचा शरदचंद्र मुक्तीबोध, नारायण सुर्वे पुरस्कार ,आपटे वाचन मंदिर इचलकरंजीचा इंदिरा संत पुरस्कार,शरद पवार ग्रंथ पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, लोकमत समूहाचा लोकमत साहित्य पुरस्कार, भि ग रोहमारे पुरस्कार, शिवसेना नवरत्न पुरस्कार, ना घ देशपांडे पुरस्कार, मराठा सेवा संघ जिजाऊ साहित्यरत्न पुरस्कार, शिक्षण महर्षी तात्याराव मोरे पुरस्कार,कविवर्य देवानंद गोरडे पुरस्कार,मराठवाडा साहित्य परिषद पुरस्कार,संत भगवान बाबा उत्कृष्ट काव्य संग्रह पुरस्कार आणि नुकताच पुणे येथे प्रदान करण्यात आलेला भा.रा. तांबे पुरस्कार इत्यादी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

**थोडासा जीवन परिचय -** अजीम नवाज राही यांचा जन्म येथील जाफराबाद मोहल्या तील गरीब मुस्लिम कुटुंबात झाला.मातृभाषा उर्दू असल्याने प्राथमिक शिक्षण उर्दूतूनच झाले.ई.५ वी नंतर माध्यमिक शाळेत पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला परंतु घरच्या गरीबी मुळे ई.८ वी च्या पुढे शिकता आले नाही.कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी वडील केळी विक्री व मोठे भाऊ आईसकांडी विक्रीचा व्यवसाय करायचे.कुटुंबाला हातभार लावावा म्हणून राही यांनी येथील बसस्थानकावर पानपट्टी व्यवसाय सुरु केला. पानपट्टी व्यवसाय जेमतेमच चालायचा.रिकाम्या वेळात राही यांची माय 'मराठी' शी संगत जुळली.मराठी विषयी आकर्षक वाटू लागले.मराठी काव्य सुचू लागले.तत्कालीन स्नेही नाट्यभूषण नाना बोरकरांना काही काव्यपंक्ती दाखविल्या असता त्यांनी प्रोत्साहन दिले. कविता सुचल्या नंतर कागदावर उतरायला लागली.'कुराणाचे' पठण करणारा आपल्या कवितांमधून 'पुराणातील' दाखले देऊ लागला.हे अचंबित करणारे होते.तत्कालीन वर्तमानपत्रात कविता छापून येण्यासाठी पाठविल्या.परंतू त्या साभार परत येत असत.मन हिरमुसून जायचे.एके दिवशी तत्कालीन -नागपूर पत्रिका- पेपरला पहिली कविता छापून आली. गगनात मावेनासा आनंद कसा असतो याची अनुभूती घेतली. अनेकांनी पत्र पाठवून अभिनंदन केले. महत्वाचे अभिनंदन पत्र जळगाव येथील मराठी कवि साहित्यिक 'खलील मोमीन ' यांचे होते. ते सुध्दा मराठी कवी तथा साहित्यिक होते.आपल्या समाजाचा एक मुलगा मराठीत लिहितो हे पाहून त्यांनाही अत्यानंद झाला होता.खलील यांनी आपल्या आपल्या सुंदर मोत्यासारख्या अक्षरांमध्ये पत्र पाठवून त्यांनी अभिनंदन करुन असेच लिहिते व्हा असे प्रोत्साहन दिले होते.हे खरे म्हणजे माझ्यासाठी प्रेरणादायी होते.त्यांची प्रेरणा घेऊन कवितेला गती प्राप्त झाली. त्यानंतर संपर्क झाला तो सिंदखेडराजा या तत्कालीन नव्या झालेल्या तहसिल चे नवनियुक्त युवा तहसिलदार शाम देशपांडे ह्यांच्याशी.हा जणू परिसस्पर्शच होता.त्यांना साहित्याची आवड होती.शाम देशपांडे यांनी राहींच्या कवितांना वेगळा आयाम देण्याचे ठरविले. तहसिलदार असूनही त्यांचे कार्य लोकाभिमुख होते.त्यांनी साखरखेर्डा येथे गज़ल गायनाचा कार्यक्रम ठेवला.त्या कार्यक्रमात राही यांच्या गज़ल गायनाने सर्वांचे लक्ष वेधले.नंतर सहकार महर्षी स्व.भाष्करराव शिंगणे यांच्या संपर्कात आल्यावर त्यांनीही प्रोत्साहन देऊन येथील पैनगंगा सूत गिरणी मध्ये नोकरी दिली. तसेच प्रोत्साहन देण्या साठी खास अजिम राहींसाठी येथील जिजामाता विद्यालयात विठ्ठल वाघ, ना. धों. महानोर, नारायण कुळकर्णी कवठेकर आदीं सारखे नामवंत कवि बोलावून कवि संमेलन आयोजित केले. या संमेलनाच्या माध्यमातून राही यांचे नाव महाराष्ट्रातील साहित्यिक क्षेत्रात पोहोचले. नंतर प्रेम कविता लिहिणाऱ्या मेहकर येथील प्रसिध्द कवि ना.घ.देशपांडे यांच्या साठी मेहकर येथे आयोजित केलेल्या विदर्भ साहित्य संमेलनात आपली दर्जेदार कविता सादर केल्यानंतर त्यांना मराठी साहित्य क्षेत्रात सर्वदूर पोहोचले.नंतर विविध कविसंमेलनात तथा साहित्य संमेलनात राही यांना सन्मानपूर्वक निमंत्रित करण्यात येऊन लागले. तेव्हापासून आज तागायत त्यांची साहित्य सेवा अव्याहत पणे सुरु च असून पुन्हा मागे वळून पाहिलेच नाही. साहित्य रचनेबरोबरच सूत्र संचालनाचा नवा आविष्कार निवडून महत्त्वाच्या कार्यक्रमांचे बहारदार सूत्र संचालन अशी दोन्ही प्रकारची कार्ये सुरु केली. आतापर्यंत शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री आर.आर. आबा पाटील, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, छगन भुजबळ,जयंत-पाटील सह महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांच्या कार्य क्रमांचे बहारदार व सूत्रबद्ध सूत्रसंचालन यशस्वीपणे पार पाडले. दरम्यान अनेक कवि संमेलनात देखील सूत्र संचालनाचा मान त्यांना मिळाला आहे.हे कार्य अव्याहतपणे चालू असून सूत्र संचालक म्हणून त्यांना महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातून मागणी वाढली आहे. आता पर्यंत दै.सकाळ सह ईतर वृत्तपत्रात सदर सादर केले असून सकाळ दिवाळी अंकासह अनेक दिवाळी अंक व साप्ताहिकात राही यांचे साहित्य प्रसारित झालेले आहे.त्यांना जाहिर झालेल्या या पुरस्कारा बद्दल त्यांचे साहित्य, राजकीय ,सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.


**- शब्दांकन : प्राचार्य डी. एन्. पांचाळ (से.नि.) बातमी दार, साखरखेर्डा, जि. बुलढाणा.**

"मला साहित्य क्षेत्रात खऱ्या अर्थाने कवितेने ओळख दिली.माझी कविता प्रामुख्याने समाजातील दुःख दारिद्र्यातून निर्माण झाली आहे.कवितेमुळे महाराष्ट्रभरातील लाखो रसिकांपर्यंत पोहोचलो आणि टिकून आहे.सूत्रसंचालन हे नविन क्षेत्र निवडले.जेष्ठ, श्रेष्ठ, नामवंत नेत्यांच्या कार्यक्रमाचे यशस्वीपणे बहारदार सूत्र संचालन केले.सूत्रसंचालनाने जगण्याची उमेद दिली" **- अज़िम नवाज राही, साहित्यिक,साखरखेर्डा.**










## कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती जिंतूर जि.. परभणी

कार्यालय ईमेल- am_jintur@msamb.com

1 ई निविदा क्र. 2025-26/01

कामाचे नाव - मार्केट यार्ड जिंतूर येथे सी सी रोड बांधकाम करणे. अंदाजित रक्कम रु 12,15,443/-निविदेची अंतिम तारीख 04/06/2025 निविदे संदर्भात सविस्तर माहिती mahatender.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे कृ. ऊ. बा. स. जिंतूर यांनी कुठलीही निविदा नाकारण्याचा व रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

सचिव.
कृ. ऊ. बा. स. जिंतूर

दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# कर्तृत्वाचा सन्मान : माधुरी पवार यांना 'वुमेन्स अचीएवर्स अवॉर्ड २०२५'

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कृष्णा हावरे.**

मेहकर : समाजातील उपेक्षित घटकांसाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या आणि महिला सक्षमीकरणाच्या चळवळीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या सप्तशृंगी महिला अर्बन को–ऑप. क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा कुमारी माधुरीताई पवार यांना 'लोकमत विमेन्स अचिव्हर्स अवॉर्ड २०२५' ने गौरविण्यात आले. अकोला येथील वी. एस. इम्पेरियल, बाळापुर नाका येथे पार पडलेल्या भव्य आणि प्रेरणा दायी सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साही वाता वरणात पार पडला. यावेळी आमदार सौ. भावनाताई गवळी, आमदार सौ. श्वेता महाले, आमदार वसंत खंडेल वाल, अकोला जिल्हा धिकारी अजित कुंभारे, आणि विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित सुप्रसिद्ध अभिनेत्री किशोरी शहाणे वीज यांनी आपल्या उपस्थितीने कार्यक्रमाची शान वाढवली. महाराष्ट्रभरातून आलेल्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला सन्मानित करण्यात आल्या. माधुरीताईंनी आपल्या समाजकार्याचा केंद्र बिंदू कायम महिलांचा सन्मान, आत्मभान आणि स्वाव लंबन ठेवल्यामुळे त्यांचे कार्य आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांनी विधवा महिलांसाठी 'हळदी कुंकू' सारख्या भावनिक उपक्रमांद्वारे त्यांचा आत्म सन्मान जपला, तर तृतीय पंथीय महिलांसाठी देखील सामाजिक सन्मान निर्माण करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन केले. त्यांच्या नेतृत्वा खाली महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्या साठी बचत गट, प्रशिक्षण शिबिरे, मार्गदर्शन सत्रे अशा उपक्रमांची सतत आखणी करण्यात आली. हे कार्य त्यांनी केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून केले नाही, तर एका व्यापक दृष्टीकोनातून समाज बदलासाठी पावले उचलली. शैक्षणिक आणि वैचारिक तयारी असलेली ही नेतृत्त्ववत् व्यक्तिमत्त्व – B. Sc., M. A.



(समाजशास्त्र), LL.M. या शैक्षणिक पार्श्वभूमीचा प्रभाव त्यांच्या कामात स्पष्टपणे जाणवतो. माधुरी ताईंनी अध्यक्षपद स्वीकारल्या नंतर सोसायटीच्या ठेवींमध्ये तब्बल ₹४० कोटींची वाढ नोंदवून एक कुशल आर्थिक व्यवस्थापक म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. त्यांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पर्यावरण रक्षणासाठी घेतलेले ठोस पावले. 'कचऱ्यातून कला' या संकल्पनेवर आधारित प्रशिक्षण उपक्रमांतून त्यांनी २००० हून अधिक महिलांना स्वाव लंबनाचा मार्ग दाखवला, तर प्लास्टिक पुनर्वापरा साठी राब वलेल्या जनजागृती मोहिमेद्वारे ५००० प्लास्टिक पिशव्या पर्यायी उपयोगात आणून पर्यावरणपूरक जीवन शैलीचा आग्रह धरला. आरोग्य क्षेत्रातदेखील माधुरी ताईंनी विशेष लक्ष दिले.मासिक पाळीविषयी समाजात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी त्यांनी जनजागृती मोहीम राबवली आणि अनेक महाविद्यालयां मध्ये सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व डिस्पोजल यंत्रांची सुविधा उपल करून दिली. महिलांच्या मोफत कोल पोसकोपी चाचण्यांचे आयोजन हे त्याच संवेदन शीलतेचे आणखी एक उदाहरण. त्यांचा सामाजिक दृष्टिकोन हा केवळ पुरोगामीच नाही, तर समावेशकही आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांना सन्मानाने मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हे आज अनेकांसाठी मार्गदर्शक ठरत आहेत. दरवर्षी लाखो भावांना राख्या पाठवण्याचा उपक्रम असो किंवा 'कबुतराला गरुडाचे पंख लावले तरी ते गरुड होत नाही, पण आपल्या पंखांत ताकद असेल तर भरारी घेणे सहज शक्य आहे' या तत्त्वावर चालत त्यांनी जीवनात घेतलेली भरारी यामुळे त्यांच्या कार्याला केवळ पुरस्कार नव्हे तर लोकांची मनापासून दाद मिळते आहे. लोकमत विमेन्स अचिव्हर्स अवॉर्ड हे केवळ एक सन्मानच नाही, तर माधुरीताई पवार यांच्या अथक प्रयत्नांना मिळालेली सार्वजनिक मान्यता आहे. त्यांच्या कार्याचा ठसा आज राज्यभरातील हजारो महिलांच्या जीवनात उमटलेला आहे आणि त्यांचा प्रवास हेच सांगतो की सकारात्मक बदल घडवण्या साठी एका विचारशील मनाची आणि कणखर इच्छाशक्तीची गरज असते ती माधुरी पवार यांच्याकडे आहे.

# आस्मानी संकटाने शेतकरी हवालदिल

## काजळेश्वरातील रामचंद्र डोंगरे यांच्या शेतातील घटणा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**



कारंजा : कारंजा तालुक्यातील काजळेश्वर उपाध्ये येथील रामचंद्र डोंगरे यांच्या उकर्डा शेत शिवारातील ६८ आर शेतीतील विहीरीवर सोलर पंप होते. मात्र पाच दिवसा पूर्वी आलेल्या चक्रीवादळाने त्यांचे सोलर पंप कोलमडून पडले. झालेल्या नुकसानाबाबत ते पार खचले आहे. सोलर पंप कंपनीने पुनर स्थापीत करून द्यावे त्याकरीता विद्यूत महावितरनाने त्यांना सहाय्य करावे अशी त्यांनी मागणी केली आहे. वृत्त असे की मागील पाच दिवसापूर्वी काजळेश्वर परीसरात आलेल्या चक्री वादळाने पार थैमान घातले होते त्यांत अनेकांचे आर्थिक नुकसान झाले. अशातच काजळेश्वर उपाध्ये येथे वास्त व्यास असलेले रामचंद्र डोंगरे अल्प भूधारक शेतकरी यांचेकडे उकर्डा शेतशिवारात ६८ आर शेत जमीन आहे. सिंचनासाठी त्याचे शेतातील विहीरीवर पाणी उपसा करण्याकरीता विद्यूत वितरण कारंजा कडे त्यांनी विद्युत जोडणी करीता २०१७–१८ साली अर्ज केला. कनेक्शन यायला उशीर होईल असे सांगण्यात आल्याने पर्याय म्हणून त्यांनी सोलरपंप घेतला. २०१७ –१८ त्यांना ओस्वाल कंपणीचा सोलर पंप मिळाला. सर्व काही व्यवस्थीत चालू असतांना काजळेश्वरसर्कल शिवारात पांच दिवसापूर्वी चक्रीवादळा सह पावसाने धुमाकूळ घातला. त्यांत अनेकांचे नुकसान झाले. रामचंद्र डोंगरे यांनी आपल्या शेतात पहाणी केली असता त्यांना विहीरीवरील सोलरपंप पार कोलमडला दिसला. तो पुनरस्था पितकरणे व सुरु व्हावा करीता चार दिवसापासून कंपणीला फोन लावत आहे मात्र ओस्वाल कंपणी कडून त्यांचा फोन घेतला जात नाही . जीवन जगण्यासाठी तेवढाच शेतीचा तुकडा त्यांचेकडे आहे. सिंचन करून आपल्या कुटुंबाचे ते पालन पोषण करतात. कंपणीने त्यांचा सोलर पुनरस्थापीत करून द्यावा याकरीता एमएसईबी कारंजा कार्यालयाने मध्यस्थी करावी अशी त्यांनी मागणी केली आहे.

# आंबराईची उतराई "या ग्रुप तर्फे मयताच्या कुटुंबातील सदस्यांना प्रत्येकी पाच आंब्याचे वृक्ष भेट;

## गावातील नष्ट झालेले आंबराई पुन्हा फुलवण्याचा ग्रुपचा प्रयत्न सुरूच

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**



साखरखेर्डा : सिंदखेडराजा तालुक्यातील शिंदी हे गाव एकेकाळी मोठ्या प्रमाणात आंब्यासाठी प्रसिद्ध होते ,गावामध्ये मोठ्या प्रमाणात आंब्याची झाडे होती .,त्यामुळे लग्न झालेल्या मुली असतील किंवा इतर नातेवाईक मंडळी असेल हे आवर्जून शिंदी येथे आंबे खाण्याकरता आंब्याचा रस पिण्याकरता येत होते, मात्र कालांतराने काळ बदलत गेला मानवाच्या गरजा वाढत गेल्या आणि एकेकाळी समृद्ध असलेले आबंराई नष्ट झाली, अनेकांनी आंब्याचे मोठाले झाडे जाळून टाकले काहींनी कापून टाकले ,हो आता बोटावर मोजणे इतकी आंब्याची झाडे शिल्लक आहेत ,त्यामुळे गावात पुन्हा एकदा आंब्याची बाग फुलण्या साठी आंब्याची वनराई नटवण्या साठी गावातील तरुणांनी पुढाकार घेतला असून गेल्या वर्षभरा पासून आमराईची उतराई हा व्हाट्सअप ग्रुप त्यांनी तयार केला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून गावातील जो व्यक्ती मरण पावला त्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यांना हा ग्रुप प्रत्येकी पाच आंब्याची झाडे भेट म्हणून देतात' व कुटुंबातील सदस्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ही झाडे लावली जातात, त्यामुळे गावात त्यांचा प्रयत्न सुरूच आहे त्यामुळे दिनांक २९ मे रोजी गावात मयत झालेल्या व्यक्तींच्या घरी हे झाडे भेट मिळून देण्यात आली यामध्ये अनिल भगवान बंगाळे' सखाराम गवई, सखाराम खरात' आत्मा राम बेलोडे यांच्या घरी आंब्याचे झाडे भेट म्हणून देण्यात आली' यावेळी आंब राईची उतराई ग्रुपचे संचालक विलास बंगाळे सर' उद्योजक गणेश सुरेश खरात' कडूबा खंडारे शिक्षक' सुनील बंगाळे' सलीम तांबोळी' गजानन रामराव खरात' पत्रकार सचिन खंडारे' यावेळी उपस्थित होते, आतापर्यंत २०० पेक्षा जास्त आंब्याच्या झाडाची लागवड करण्यात आली आहे

# बार्शीटाकळी तालुक्यातील अवैध धंद्याला आवर कोण घालणार? सर्वसामान्यांचा प्रश्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रदीप गावंडे.**




बार्शीटाकळी : नव्याने रुजू झालेले जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यांनी जिल्ह्यातील सर्वत्र अवैध धंदे बंद करण्याचे आदेश संबंधित ठाणेदारांना दिले आहे, एस, पी चांडक यांनी 30 जून पासून जिल्ह्यात "ऑपरेशन प्रहार" ही मोहीम अवैध धंद्याविरुद्ध उभारली आहे, या ऑपरेशन प्रहार मोहिमेला कितपट प्रतिसाद मिळतो, आता हेच बघायचे आहे, कारण बार्शीटाकळीत अनेक प्रकारचे अवैध धंदे अजूनही सुरूच असल्याची चर्चा आहे, परिस रातील कोथळी टिटवण, धाबा, पूनोती, राजनखेड, इत्यादी ठिकाणी सर्व प्रकारचे अवैध धंदे सुरू असल्याची चर्चा आहे, त्यामुळे "ऑपरेशन प्रहार" या मोहिमेने याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची गरज असल्याची माहिती आहे, अकोल्याला एक निर्भीड आणि प्रामाणिक एस, पी ,लाभल्यामुळे जिल्ह्यातील सर्वत्र अवैध धंदे बंद होतील ,अशी सर्वसामान्य लोकांना अपेक्षा आहे, संबंधित ठाणेदार आणि त्यांच्या टीमने अवैध धंद्यावाल्यांना धंदे बंद करण्याची सूचना दिली आहे, परंतु, काही वरली मटक्याचे ठेकेदार चोरून लपून वरली मटक्याचे व्यवसाय चालवत असल्याचे समजते, पोलिसांना चकमा किंवा त्यांची दिशाभूल करून बार्शीटाकळी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये आजही अनेक प्रकारचे अवैध धंदे सुरू आहेत, त्यामुळे या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न सुद्धा उपस्थित होऊ शकतो, बार्शीटाकळी हद्दीतील सर्वत्र अवैध धंद्याचा नायनाट करावा, अशी सर्वसामान्य नागरिकांची आणि महिलांची मागणी आहे, चोरून लपून होत असलेले हे अवैध धंदे तातडीने बंद करण्याची गरज निर्माण झाली आहे, कारण यामुळे गोर गरिबांच्या घरात भांडण तंटे, दारू पिऊन परिवारांना मार हाण करणे, कारण नसताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्याची पोलि सांनी त्यांचे मनगट पकडून वठणीवर आणावे, अशी देखील लोकांची मागणी आहे,

# पहूरपूर्णा सरपंच सचिवांनी भ्रष्टाचार केल्याप्रकरणी उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांनी केली मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार

**सेवाशक्ती टाईम्स.**
**देवचंद्र समदूर.**



शेगाव : पंचायत समिती शेगाव अंतर्गत येत असलेल्या ग्राम पहूरपूर्णा ग्रामपंचायत मध्ये सरपंच सचिवांनी लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्य शालिग्राम श्रीराम बाराहाते उपसरपंच नंदाताई नितीन बरडे व गावकऱ्यांच्या साह्याने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कार्यालय बुलढाणा येथे दिनांक. 29 / 5 / 2025 रोजी तक्रार दाखल केली सदर तक्रारी मध्ये कामांच्या देय काच्या रकमाची अफरा तपफर व भ्रष्टाचार करून शासकीय निधीचा अपहार केल्याबाबतची चौकशी होणे संदर्भात तक्रार केली आहे यामध्ये मारुती मंदिराजवळ कंपाऊंड, कामाचे किंमत एक लाख रुपये, स्मशानभूमीसाठी शेड व रस्ता कामाची किंमत तीन लाख रुपये, गुरांच्या पाण्याच्या हौदाची दुरुस्ती कामाची किंमत एक लाख रुपये, कचराकुंडी घेणे एक लाख वीस हजार रुपये, ग्रामपंचायत विद्युत बोरला टीमोड करणे खर्च 94366, ग्रामपंचायत विद्युत बोरला तीनशेड करणे 39835 रुपये. धूर फवारणी यंत्र पन्नास हजार रुपये, आरो शेड बांधकाम दोन लाख रुपये, वरील प्रमाणे सरपंच सचिव पहूरपूर्णा या दोघांनी आपसी संगमताने गावातील कामाच्या देयकाच्या रकमांची अफरा तफर करून भ्रष्टाचार केलेला आहे तरी सदर प्रकरणात सरपंच सचिव यांची वरील देयकाच्या भ्रष्टाचार संबंधात सखोल चौकशी करून कार्यवाही करावी अशी मागणी यावेळी निवेदनात केली आहे वरील तक्रारीच्या प्रतिलिपी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व ग्राम विकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांना सुद्धा देण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद शाळेत पहिल्या वर्गात प्रवेशपात्र विद्यार्थांच्या पालकांना घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्याचा शिंदी ग्राम पंचायतीचा निर्णय

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**



साखरखेर्डा : ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ह्या शिक्षणाचा पाया असून तो बजबुत असला तर विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात जाऊ शकतो. जिल्हा परिषद शाळा टिकवण्या साठी ग्राम पंचायतीच्या माध्यमातून अनेक सरपंच यांनी लोक उपयोगी उपक्रम हाती घेतला आहे. शिंदी ग्राम पंचायतीच्या सरपंच सौ साधना अशोक खरात यांनी ठराव घेऊन पहिली मध्ये प्रवेश पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. सिंदखेडराजा तालुक्यातील हिवरा गडलिंग पाठोपाठ शिंदी ग्राम पंचायतीने आज ग्राम पंचायत सदस्यांची बैठक बोलावून उपरोक्त ठराव मांडला. त्याला सर्व ग्राम पंचायत सदस्यांनी पाठिंबा दिला. साखरखेर्डा केंद्रांतर्गत शिंदी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची गुणवत्ता चांगली आहे. त्याच बरोबर पहिली पासून आठवी पर्यंत विद्यार्थी संख्या देखील चांगली आहे. शालेय उपक्रमाला ग्राम पंचायतीने नेहमी सरळ हाताने मदत केली आहे. आज सुसज्ज इमारत, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी डेक्स बेंच, ५० इंच एल ई डी टिव्ही, दरवर्षी लोक सहभा गातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप असे उपक्रम राबविले जातात. त्याच बरोबर इंग्रजी विषय पहिली पासून शिकविल्या जातो. चौथी आणि सातवी मध्ये कालरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत येतात. येथील शिक्षक गुणवत्ता टिकविण्यासाठी मेहनत घेतात हे या शाळेचे वैशिष्ट्य आहे. साखरखेर्डा केंद्रात सर्वाधिक विद्यार्थी संख्या असलेली शाळा आहे. सरपंच साधना अशोक खरात यांनी घेतलेल्या निर्णयांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# अकोला पोलिसाची सार्वजनिक ठिकाणी दारूपिणार्या 15 इसमाविरुद्ध कडक कारवाई

**सेवाशक्ती टाईम्स.**
**जुनेद आली.**

अकोला : अकोला जिल्हा कायदा व स्वयस्थेच्या प्रश्न निर्माण होऊ नये तसेच नागरिकांना सुरक्षित स्पीच आणि शांततामय वातावरण मिळावे यासाठी अकोला पोलीसाकडून सार्वजनिक ठिकाणी दारू पिण्याच्या इसमावर खडक कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे अकोला जिल्ह्यात नावनियुक्त पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी पदभार स्वीकारल्यानंतर हे निर्देश अकोला पोलिसांना दिले आहेत सर्व जाणिक ठिकाणी दारु पिऊन गोधड घालण्या व्यक्तीमुळे अनेकदा सर्वजणी ठिकाणी गैर सोयीचे प्रसंग घडतात भांडणे होतात आणि त्यामुळे कायदा व संस्थेच्या प्रसन् निर्माण होतो या पाशर्वभूमीवर अशा प्रकारच्या घटनांना वेळीच प्रतिबंध घालण्या साठी अकोला जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना कारवाई करण्याचे आदेश देण्यातत आले आहेत सदर मोहीमे अंतर्गत पोलीस विभागाच्या वतीने दिनांक 28 मे रोजी विशेष पथके तयार करून सार्वजनिक ठिकाणी दारु पिऊन गोधळ घालने इतर नागरिकांना त्रास देणे किंवा कायद्याचे उल्ल उल्लंघन करण्याच्या 15 इस्मावर मुंबई पोलीस अधिनियम अंतर्गत आवश्यक ती कारवाई करण्यात आली तसेच संपूर्ण जिल्ह्यात नाकाबंदी राबवून नाकाबंदी दरम्यान जिल्ह्यातील एकूण ३५ नाकाबंदी पॉईंट वर ११७८ वाहने चेक करून मोटर वाहन कायद्यान्वये ३०५ पाच कारवाई करून १ लक्ष ४७ हजारो ८०० रुपये दंड करण्यात आला कुत्यापासून नागरिकांनी दूर रहावे आणि कोणत्याही अनुचित घटना घडल्यास तत्काळ पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा अकोला पोलिसाकडून ही मोहीम अधिक तीवतेने राबवणी जाणार असून कायद्या मोडण्यावर कोणतीही सानूभुती दाखवली जाणार नाही करीत सर्व नागरिकांनी कायद्याचे पालन करावे आणि शहराच्या शांततेत योगदान घ्यावे व नागरिकांच्या सहकार्यानेच शहरात शांतता व सुव्यवस्था रखली जाऊ शकते असे पोलीस अधीक्षक अकोला यांनी केले आहे

# चिखली येथे हिंदू सूर्य महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

## भव्य दिव्य मोटरसायकल रॅली,सामूहिक अभिवादन, राष्ट्रगीताने सांगता

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



चिखली : वीर शिरोमणी हिंदू सूर्य महाराणा प्रताप सिंह यांची ४८५ जयंती चिखली येथे भव्य मोटरसायकल रॅली ,सामूहिक अभिवादन आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली यावेळी ४७ युवकांनी रक्तदान केले.व जणूकाही हिंदूसूर्य महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रखर राष्ट्रप्रेमाच्या विचारचा वारसा पुढे चालत ठेवला.चिखली येथे दरवर्षी हिंदू सूर्य महाराणा प्रताप सिंह जयंती साजरी करण्यात येते यावर्षी सुद्धा चिखलु शहराच्या. हृदय स्थानी असलेल्या अश्वारुढ हिंदू सूर्य महाराणा प्रताप सिंह यांच्या पुतळा परिसरात जयंती साजरी करण्यात आली .दि. २८ मे च्या रात्री महाराणा प्रताप पुतळा परिसरामध्ये आकर्षक अशी विद्युत रोषणाई समितीच्या वतीने करण्यात आली सोबतच फटाक्याच्या आतिशबाजीने महाराणा प्रताप सिंह यांना मानवंदना देण्यात आली मनमोहक अशा फटाक्याच्या आतिषबाजीने कार्यक्रमाची सुरुवात झाली व सकाळी सात वाजता पंचा मृताने अभिषेक करण्यात आला जयंतीच्या निमित्ताने चिखली शहरातील मुख्य रस्ते हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह यांची प्रतिमा असलेल्या भगव्या ध्वजाने चिखली शहरातील मुख्य रस्ते भव्यमय करण्यात आले होते अकरा वाजता समस्त महाराणा प्रताप प्रेमींनी सूर्य महाराणा प्रताप सिंह यांचा जयजयकार करून पूजन करून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली सर्व मोटर सायकलवर भगवे ध्वज लावण्यात आले होते. वाद्याच्या गजरात रथावर महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रतिमेची मिरवणूक शहरातून काढण्यात आली यामध्ये प्रामुख्याने बस स्टँड परिसर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, जयस्तंभ चौक, बैलजोडी चौक, नगरपरिषद, पंचायत समिती, राऊतवाडी, खामगाव चौफुली, सिद्ध सायन्स चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शेवटी पुतळा परिसरामध्ये सामूहिक राष्ट्रगीताने कार्य क्रमाची सांगता करण्यात आली व यावेळी उपस्थित प्रमुख चिखली विधान सभा मतदारसंघाचे आमदार श्वेता ताई महाले पाटील व युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषीभाऊ जाधव यांच्या हस्ते खिचडीचे वाटप करण्यात आले पुतळा परिसरा मध्ये करण्यात आलेली सजावट सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. जयंती कार्य क्रमाला चिखली विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्वेताताई महाले पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, केंद्रीय मंत्री नामदार खासदार प्रतापरावजी जाधव यांचे चिरंजीव तथा युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषीभाऊ जाधव, शिवसेना जिल्हा प्रमुख ओमसिंग राजपूत, अंकुशराव पडघान पाटील,डॉ. प्रतापसिंग राजपूत , ठाणेदार संग्रामसिंह पाटील ,कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती डॉ संतोष वानखेडे, डॉ प्रतापसिंग परिहार, राष्ट्र वादी काँग्रेस विधान सभा अध्यक्ष मनोज दांडगे ,पत्रकार सुधीर चेके पाटील, डॉ अजा बराव वसु, माजी उपनगरा ध्यक्ष कुणाल बोंद्रे, शंतनु बोंद्रे ,सचिन बोंद्रे, माजी सभापती डॉ सत्येंद्र भुसारी, संजय चेके पाटील, रामभाऊ जाधव, रवी तोडकर, केवळ सिंग ठाकूर, नितीन राजपूत, भाजपा तालुका अधक्ष डॉ कृष्ण कुमार सपकाळ, शिवसेना तालुका प्रमुख गजानन मोरे , शिवसेना माजी तालुका प्रमुख विश्वासराव खंडागळे, माजी नगर सेवक निलेश गावंडे, युवा सेना जिल्हा प्रमुख नंदू कराडे, माजी नगरसेवक निलेश अंजनकर, डॉ राजू गवई ,शरद हाडे माजी जिल्हा परिषद सदस्या , परमेश्वर सोळंकी, अभिजीत राजपूत, राणी पद्मावती महिला मंडळाच्या सर्व महिला सुभाषभाऊ राजपूत ,माजी नगरसेवक शैलेश बाहेती, दीपक लहाने, वसंतराव गाडेकर, विजय सिंग इंगळे, माजी सरपंच वैरागड अमोल साठे , रोहित खेडेकर, शिवसेना शहर प्रमुख विलास घोलप, भास्करराव राऊत, विनायक सरनाईक ,अनिल वाकोडे, अनमोल ढोरे, भाजपाचे अध्यक्ष सागर पुरोहित, संतोषराव काळे, दीपक लहाने, मनसे जिल्हा प्रमुख गणेश बरबडे उपजिल्हा प्रमुख मनसे उपजिल्हा प्रमुख राजेश परिहार, प्रदीप वाकोडे, शिवसेना तालुका प्रमुख किसन लाल घोंडगे, सुदर्शन खरात, डॉक्टर मोहम्मद ईसरार, शौकत भाई, आनंद गैची, अमिन शेख, निताताई सोळंकी, विजय वाळेकर, कूष्णा साळोख,सुमंता इंगळे, उत्सव समितीचे सर्व कार्यकर्ते विविध गावचे सरपंच, माजी सरपंच, विविध पक्षाचे पदा धिकारी कार्यकर्ते व महाराणा प्रताप प्रेमी नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# भाजपा शहर उपाध्यक्ष यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालयत फळ वाटप

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अंकोश राठोड.**



मेहकर : भाजपा शहर उपाध्यक्ष किशोर लादे यांचा वाढदिवस साजरा. मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ व बिस्कीट वाटप करून केला वाढदिवस साजरा रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मेहकर येथील भाजपाचे शहर उपाध्यक्ष किशोर लादे हे नेहमीच राजकीय व सामाजिक कार्यात अग्रेसर असतात यावेळी किशोर लादे, डॉ प्रशांत राठोड भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य, डॉक्टर धैर्यशील रहाटे वैद्यकीय अधिकारी मेहकर डॉक्टर स्वप्निल चव्हाण वैद्यकीय अधिकारी मेहकर डॉक्टर सुनिता हिवसे वैद्यकीय अधीक्षक. भाजपा जिल्हा सचिव ॲड. अरुण निकम. भाजपा तालुका अध्यक्ष सारंग माळेकर. भाजपा शहराध्यक्ष सौ शिल्पा देशमुख. भाजपा तालुका सरचिटणीस ॲड. रंजीत कांबळे. भाजपा तालुका उपाध्यक्ष शिवशंकर मगर. भाजपा शहर उपाध्यक्ष रवी गाडेकर. भाजपाच्या उपाध्यक्ष राहुल चोंढीकर. मंगेश बनसोडे तालुका ध्यक्ष युवा मनोज खंडागळे. सौ नंदाताई खंडागळे. पंकज देशमुख. शिवसेनेचे शिवा भाऊ तुपकर. धनंजय जाधव. प्रशांत बोरे. गोपाल गोरे. राजू भाऊ डोंगरे. दीपक लहाने. परमेश्वर शिंदे. किशोर गायक वाड व इतर मान्यवर उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद विद्यालयात 18 वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शुध्दोधन खंदारे.**



मंठा : येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात 18 वर्षानंतर विद्यार्थी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. सन 2006-2007 मध्ये शिकत असलेल्या स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन स्नेह मिलन साजरे केले. सर्व माजी विद्यार्थी व शिक्षक वृंदांना फेटे बांधून गुरुवार (ता. 29) रोजी शहरातील माऊली मंगल कार्या लयात संगीत खुर्ची, गाण्याच्या भेंड्या व विविध खेळ खेळून मनसोक्त आनंद घेतला. दुपारी स्नेह भोजन घेऊन शालेय जीवनातील आठवणीला माजी विद्यार्थ्यांनी उजाळा दिला. यावेळी सूत्रसंचालन विजय राठोड यांनी केले व श्रीमती मोनिका राठोड यांनी कार्यक्रमाची रुपरेषा सांगून सुरुवात केली तसेच शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यांनी बोलतांना शाळेचे माजी मुख्याध्यापक अंकुशराव मोरे यांनी सांगितले की, कोणी शिक्षक झाले तर कोणी स्पर्धा परीक्षामार्फत नोकरीला लागले. सर्व आपल्या जीवनात व्यस्त असताना देखील स्नेहमिलन घडवून आणला व या माध्यमातून आपल्या जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा करुन दिला. त्यामुळे मैत्रीचे नाते अधिक घट्ट झाल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.त्यामध्ये कपिल बोराडे, सुभाष बोराडे, विजय बोराडे, किशोर झोल, कृष्णा खरात, मोसीन बागवान, अमोल ठोकरे, प्रकाश चव्हाण, रवी बोराडे, राजेश खंदारे, संभाजी काकडे, अजय वाघ, संजय चव्हाल, इमरान पठाण, ,संतोष बोराडे, सिद्धेश्वर निर्वल, असे गणेश घनवट, सचिन शिंदे, अशोक खराबे, मुजा खराबे ,सचिन मोरे, सोहेल शेख ,प्रशांत प्रधान,सचीन आघाव, बाळासाहेब टाके, लक्ष्मण काकडे, रणवीर सुरवसे मुलीमधून वर्षा केंद्रे, भारती लोमटे, मीना खंडागळे, शिल्पा बोरकर, माधुरी घुगे, ज्योती जोहरे, शांता घायाळ, रेखा पूरी, स्वाती वैद्य, श्रद्धा सोनटक्के, प्रियंका मगर,राधा घोगरे, रेखा शिंदे,रहीसा शेख यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक वर्ग, मोरे सर,मगर सर,आघाव सर, व्हि. बी. जाधव, एस. एन. मोरे. सर, रमेश शिंदे, खराबे सर, सुधाकर घुगे, पंढरीनाथ काकडे यांनीही मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय बोराडे ,प्रकाश चव्हाण, कृष्णा खरात, सुभाष बोराडे, किशोर झोल यांनी परिश्रम घेतले तर आभार प्रदर्शन विजय राठोड यांनी मानले.

# कारंजा मानोरा मतदार संघाच्या आमदार सईताई डाहाके शेतकऱ्याच्या बांधावर नुकसान ग्रस्त शेतीची पाहणी करून तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश !

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**



कारंजा लाड : कारंजा तालुक्यातील कारंजा मानोरा मतदार संघात मागील दिवसात सतत झालेल्या मुसळधार अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले . शेतातील भुईमूग तीळ फळबाग पीक हातचे गेले विशेत:भुईमुग व इतर उन्हाळी पिकांचे नुकसान झाले आहे.परिणामी भूमिपुत्र हा त्रस्त व हवालदिल झाल्याचे चित्र आहे.त्यामुळे शेतकरी प्रचंड अडचणीत आला आहे.कारंजा मानोरा मतदार संघाच्या आ. सईताई डहाके यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतबंधावर जाऊन शेतीची, पिकांची व झालेल्या नुकसानीची पाहणी दि २९ मे रोजी प्रत्यक्ष शेतावर जाऊन केली.तसेच कारंजा महसूल विभागाला तात्काळ पाहणी करून पंचनामे करण्याचे आदेश दिले. शेतकऱ्यांना आश्वासीत केले की एकही नुकसानग्रस्त शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही. त्यांना शासकीय मदत मिळवून देणार असल्याचे आमदारांनी शेत कऱ्यांना आश्वासन दिले. महायुती सरकार हे शेतकऱ्यांप्रति संवेदन शिल आहे लवकरात लवकर तुम्हाला मदत मिळणार असून याबाबतीत आमदार नुकसान ग्रस्त शेतीची पाहणी करते वेळी कृषि विभागाचे कर्मचारी व महसुल विभागाचे नायब तहसीलदार वाडेकर, मंडळा धिकारी, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच भाजपा माजी तालुका अध्यक्ष राजीव काळे इत्यादी परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

# पुरात वाहुन गेलेल्या इंगळे यांचा मृतदेह तीन दिवसांनंतर सापडला

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

खामगाव : खामगाव शहर व तालुक्यात २७ मे रोजी सायंकाळ पासून रात्रीपर्यंत जोरदार पाऊस पडत होता. त्यामुळे नद्या-नाल्यांना पुर आला होता, तर घारोड येथील धोंडुजी भगवान इंगळे व राहुल मधुकर इंगळे हे दोघे सायंकाळी दुचाकीने शेतातून घरी परत येत असतांना घारोड-अकोली नाल्या वरील पुलावरून वाहणाऱ्या पाण्याचा अंदाज न आल्यामुळे दोघेही पुराच्या पाण्यात वाहत गेले. राहुल इंगळे याला पोहता येत असल्याने तो बचावला. तर धोंडुजी इंगळे पुरात वाहून गेले. या घटनेनंतर ना. आकाश फुंडकर यांच्या आदेशाने प्रशासनाने गावकऱ्यांच्या मदतीने वृध्दाचा शोध घेणे सुरु केले होते. परंतु धोंडुजी यांचा दोन दिवस उलटूनही शोध लागला नव्हता. ३० मे रोजी सकाळी धोंडुजी इंगळे यांचा मृतदेह घारोड शिवारातील साठवण तलावाच्या भिंतीजवळ झाडा झुडपाला अडकलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यानंतर घटनास्थळी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. हिवरखेड पोलिसांनी घटनास्थळी पोहचुन मृतदेहाचा पंचनामा केला व शव विच्छेदन करुन अंत्यसंस्कार केले.

# पारडी मोझरी बुदुक परिसरात अवकाळी पावसाचा धुमाकूळ

## शेतक-याच्या भुईमूग, तीळ पिकाचा सत्यानाशः शासनाने नुकसान भरपाई द्यावी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रदीप गावंडे.**



बार्शीटाकळी : तालुक्यातील पिंजर मंडळामधील पारडी - मोझरी बुद्रुक परिसरात चार दिवसापूर्वी अवकाळी पावसाने मोठा धुमाकूळ घातला होता, त्यामुळे भुईमूग आणि तीळ पिकाचा सत्यानाश झाला आहे, शेतकऱ्याच्या डोळ्यात देखत पावसाने भुईमुगाच्या शेंगा कुठे पावसात वाहून गेल्यात, तर कुठे भुईमूग काढत असताना अवकाळी पावसामुळे शेंगा भिजल्या, तीळ पिकाचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे,बऱ्याच शेतकऱ्यांना माल घरी नेता आला नाही, अव काळीने शेतकऱ्याच्या पिकाचे फार मोठे नुकसान केले आहे, त्यामुळे शासनाने अशा नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचा सर्वे करून त्यांना तातडीने मदत देण्यात यावी, अशी या भागातील शेतकऱ्यांची मागणी आहे, शेतकरी हा दररोज काबाडकष्ट करून आपल्या शेतातून उत्पन्न काढण्याचा प्रयत्न करतो, परंतु निसर्ग सात देत नसल्यामुळे आणि शासन शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव देत नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांची मानसिकता बिघडली आहे, ऊन असो, वारा असो ! कोणत्याही परिस्थितीत शेतकरी हा आपल्या शेतात काबाडकष्ट करून उत्पादन काढतो, परंतु शेत कऱ्यांना कधी निसर्ग साथ देत नाही, तर दुसऱ्या बाजूने शासन शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव देत नसल्यामुळे शेतकरी नाराज आहेत, म्हणजे, आज शेतकऱ्यांनी जेवढा पैसा ज्वारी, भुईमूग, फळबाग, तीळ भाजी पाला या पिकासाठी खर्च केला, तो खर्चही शेतकऱ्यांना निघत नाही, गेल्या हंगामात सोयाबीन पिकाची सुद्धा तीच परिस्थिती झाली, सोयाबीन पिकावर जेवढा पैसा शेतकऱ्यांनी खर्च केला तेवढे उत्पन्न देखील या भागातील शेतकऱ्यांना झाले नाही, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी रब्बी पिकाकडेआपला कल दिला होता, परंतु या पिकातही शेतकऱ्यांना यश आले नाही, म्हणजे सर्वत्र शेतकऱ्याची आज अशी गंभीर परिस्थिती झाली आहे की," बाप जेऊ घालेना , अन् आई भिक मागू देईना"अशी काहीशी परिस्थिती निर्माण झाली आहे, परिणामी ग्रामीण भागातील प्रत्येक शेतकरी हा हदबल झाला आहे, गेल्या चार दिवसांपूर्वी अवकाळी पावसाने पारडी, मोझरी बुद्रुक येथील शेतकरी अनिल रामराव कुकडे, बाळकृष्ण देविदास सारसे, रामराव शंकर कुकडे, धनराज अनंतराव इंगळे, बंडू साहेबराव काकड, यांचे शेतातील भुईमूग, आणि बाळकृष्ण देविदास सारसे, उल्हास दामोदर काकड, बबन शामराव काकड, बंडू अनंतराव सारसे, सुरेश भाऊराव काकड, यांचे शेतातील तीळ या पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे, त्यामुळे शासनाने आज असा गंभीर परिस्थिती शेतकऱ्यांच्या पाठीशी राहून झालेल्या पिकाचा तातडीने सर्वे करून शेतकऱ्यांना त्याची नुकसान भरपाई द्यावी ,अशी मागणी देखील या निमित्त्याने उपस्थित होत आहे,